2013-2014 (Journal) Internal

International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
May 2014
Issue-II, Volume-II
Online Journal
ISSN No. 2347-8268

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार"

प्रा. के. आर. रामटेके
डॉ. अरूण मोटघरे महाविद्यालय कोंढा–कोसरा, ता. पवनी जि. भंडारा

सारांशः–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार व्यापक स्वरूपाचे होते. शिक्षणाचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला मिळायला पाहिजे असे मत त्यांचे होते. शिक्षण हा अत्यंत महत्वाचा घटक असून यातूनच मानवाचा सार्वांगीण विकास होतो. अस्पृश्य समाजामध्ये जागृती व प्रगती घडवून आणण्याचा एकमेव मार्ग शिक्षणचं आहे. शिक्षणामुळे मानवाला मानवासारखे समानतेच्या पायावर आधारीत जीवन जगण्याची संधी देते व त्यांच्यातील पशुत्व नाहीसे होते. प्राचिन काळापासून इतिहास तपासुन पाहिला तर कनिष्ठ जातीतील लोकांना शिक्षण घेण्याची मुभा नव्हती. त्यामुळे कनिष्ठ जातीमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. समाजात बुरसटलेल्या चालीरिती, परंपरामुळे मानवी जीवन दूःखमय बनले होते. मात्र भारतात आलेल्या प्रबोधनाच्या लाटेतुन शिक्षण घेणे मुलभुत अधिकार आहे, असा प्रचार प्रसार झाला. कुठल्याही देशाच्या विकासात शिक्षणाला अतिशय महत्व असते. ज्या देशातील नागरीक जास्त शिक्षित असतील त्या देशाचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास झालेला दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षण घेवून त्या शिक्षणाचा उपयोग समाजासाठी केला. "शिक्षण म्हणजे परिवर्तन" हे बाबासाहेबांच्या शिक्षणविषयक विचारांचं मुख्य सुत्र होतं. गोरगरीबांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी बाबासाहेबांनी शिक्षण संस्था स्थापन केल्या. एवढयावरचं न थांबता शिक्षणासंबंधी लोकांमधे जनजागृती केली. भारतीय राज्यघटनेच्या कलम 45 नुसार चौदा वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण दयावे अशी तरतुद केली. स्वातंत्र्य, समता, बंधूता शिक्षणामुळे ख–या अर्थाने नांदेल असा विश्वास बाबासाहेबांना वाटेले. शिक्षणामुळे गरीबी, अज्ञान,दारिद्रय या सर्वच बाबींवर यशस्वी मात करता येते. आज झालेली शिक्षण क्षेत्रातली प्रगती ही बाबासाहेबांच्याच कार्याचा परीपाक आहे.

प्रस्तावनाः–

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अत्यंत बुद्धीमान, कायदेपंडीत अशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विश्वमर ओळख आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणावर पुस्तके लिहिले नाही हे खरे आहे पण त्यांनी चालविलेल्या शिक्षण विषयक चर्चेतुन



Scanned by CamScanner

व्याख्यानातुन शिक्षणविषयक विचार सविस्तर स्पष्ट झालेले आहेत व ते अत्यंत मौलिक स्वरूपाचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षण घेऊन समाजात असलेली अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न केला. स्वतः पुस्तके लिहून त्यांनी शिक्षणाचे महत्व पटवून दिले. आंबेडकरांच्या जीवनावर लहानपणापासून अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले होते. अस्पृश्यतेचे निर्मूलन व जातीभेद रहीत समाजाची स्थापना हे त्याचे ध्येय होते. याशिवाय त्याच्या विचारावर बौध्द धर्म व तत्वज्ञानाचा बराच प्रभाव पडला. शिक्षण विषयक विचार काही प्रमाणात त्यांना आलेल्या जीवनात अस्पृश्य हया नावाने आलेली कटू अनुभवातून स्फुले आहेत. शिक्षणामुळे समाजात अन्यायकारक रूढी परंपरा, अंधश्रध्दा नष्ट झाल्याशिवा राहणार नाही म्हणून प्रत्येक अस्पृशांनी शिक्षणाचा स्विकार करावा. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण भारतीय मागासवर्गीयांना घेण्याची संधी मिळवून दिली. त्यांचे शिक्षणविषयक विचार हे अभ्यासपूर्ण, तत्वबद्ध आणि विद्यार्थी केंद्रित असून आजही कालसुसंगत आहेत. शिक्षणसंस्थांचा कारभार, अभ्याकम, शिक्षक, त्यांची गुणवत्ता याकडे बाबासाहेब लक्ष ठेवीत होते. या शोधनिबंधात बाबासाहेबांच्या शैक्षणिक विचारांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

उद्देश :—

(1) बाबासाहेबांनी सांगितलेल्या उच्चशिक्षणविषयक विचारांचा अध्ययन करणे.

(2) बाबासाहेबांनी मागासवर्गीयांना शिक्षणाची संधी मिळवून दिली यांचेही अध्ययन करणे.

(3) शिक्षणविषयक कामगीरीमुळे दलितांच्या जीवनावरील प्रभावाचे अध्यायन करणे.

प्राथमिक शिक्षण:—

बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणावर विशेस भर दिली कारण शिक्षणातील सर्वात खालचा थर अमिशय महत्वाचा असतो. त्या दृष्टीने बाबासाहेबांनी 1927 ला प्राथमिक शिक्षणासाठी शासनाने जास्तीत जास्त अनेदान दयावे अशी मागणी केली होती. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे असेही त्यांना वाटते. तसेच शिक्षण हे मोफत असावे. यामुळे गोरगरीब जनतेला शिक्षणाची संधी घेता येईल. प्राथमिक शिक्षणासाठी श्रीमंत लोकांवर अधिक कर लावून गरीबांच्या मुलांना शिक्षण दयावे. शिक्षण ही बाब सर्व क्षेत्रापेक्षा निराळीच होती. अंधाराच्या खाईत सापडलेला मागासवर्ग या संधीने हळूहळू प्रगत होईल. शिक्षण हे वाधिणीचे दूध आहे, हे पटवून दिले. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार राष्ट्रीय



Scanned by CamScanner

प्रगतीच्या इमारतीचा पाया असतो. स्त्री–पुरूष शिक्षणावर भर दिला म्हणूनच शैक्षणिक संस्था शासनाच्या अधिपत्याखाली असाव्यात असा आग्रहशुद्धा धरला होता. तळागळातील दिन–दलितांचा सार्वांगीन विकास हेच बाबासाहेबांच्या मुख्य उद्देश होता.

उच्च शिक्षणः–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांची मुले उच्च शिक्षण घ्यावीत म्हणून शैक्षणिक संस्था सुरू करण्याचे ठरवले. 1928 मध्ये दोन वस्तीगृह सुरू केले आणि काही कालावधीत 'डिप्रेस्ड क्लासेस एज्यूकेशन सोसायटी' ची स्थापना केली. 1945 मध्ये 'पिपल एज्यूकेशन सोसायटी' ची स्थापना केली. या संस्थेमार्फत मुंबईत 'सिद्धार्थ कॉलेज' सुरू केले. याच संस्थेचे इ.स. 1950 मध्ये 'मिलींद कॉलेज' औरंगाबाद येथे सुरू करण्यात आले. औरंगाबादमधील नागसेन वनाच्या परीसरामध्ये विविध शाखांची महाविद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालये, महाविद्यालयिन मुला–मुलींसाठी वस्तीगृहे सुरू करण्यात आली आहेत. या कार्यामुळे आज या परीसरातुन लाखो दलित मुले मुली शिक्षण घेऊन बाहेर पडत आहेत.

शिक्षणाच्या प्रचारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आणखी एक उपकम हाती घेतला त्यांनी गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवण्याचे ठरविले. इ.स. 1945 मध्ये वीस विद्यार्थ्यांची पहिली तुकडी उच्च शिक्षणासाठी त्यांनी अमेरिका व इंग्लंडला पाठविली.

उच्च शिक्षणाचे मानवी आयुष्यात अत्यंत महत्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वानुभवाने उच्च शिक्षणाचे किती महत्व आहे ते मिलींद महाविद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणातून सांगतात, हिंदू समाजाच्या अगदी खालच्या स्तरातुन आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्व आहे हे मि जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र आणि निवा–याची सोय करून पुर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुस–याचे गुलाम व्हावे लागते. न्युनगंड त्याच्यातून नाहीसा करणे चालू समाजपद्धतीमुळे जे त्यांचे जीवन निर्दयपण लुबाडण्यात आले आहे. त्यांचे त्याच्या स्वतः आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्व आहे याची जाणिव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रचाराखेरीज कशानेच हे साध्य होणार नाही. आजच्या सर्व सामाजिक दूःखण्यावर, माझ्या मताप्रमाणे उच्च शिक्षण हेच औषध आहे.


Scanned by CamScanner

प्रस्थापित समाजव्यवस्थेवर विकृतपणे लुबाडण्यात आलेल्याच्या जीवनात उच्च शिक्षणाचे महत्व, तसेच राष्ट्राच्या उभारणीसाटी त्याची आवश्यकता काय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वरील विधानातुन स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, 'शिक्षण म्हणजे व्याक्तीचे मानसिक व बौध्दीक विकास करून आणणारे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधायचे व राजकिय स्वातंत्र्य मिळविण्याचे शास्त्र आहे. व्यक्तीच्या वैयक्तीक जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी विद्येची चोवीस तास साधना करावी लागेल कारण विद्या ही एखादया महासागरासारखी आहे. विद्येची ही साधना यशस्वी झाली तर माणुस जगाच्या पाठीवर आपली किर्ती पसरवू शकतो. उच्च शिक्षणामुळे समाजाचा मानवाचा दर्जा हा ठरत असतो त्यामुळे उच्च शिक्षण हे मानवी विकासाचे प्रगतीचे प्रतीक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला इतर समाजाच्या बरोबरीला आणण्यासाठी राज्यघटनेतील कलम 46 प्रमाणे शैक्षणिक सवलतींची तरतूद केली. घटनेतील कलम 29 प्रमाणे सरकारी मदत घेणा–या शैक्षणिक संस्थेत अस्पृशांना मुक्त प्रवेश असेल असे ठरविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षणातून बरीच अस्पृशांची मुले शिक्षण घेतली त्यामुळे येथील मागास वर्गाची मुले उच्च शिक्षण घेऊन शासनाच्या कार्यप्रणालीत सहभागी झालीत.

विद्यापीठ शिक्षणः–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विद्यापीठ म्हणजे ज्ञानमंदीर असावीत असे वाटत होते. तेथे विद्यार्थ्यांच्या अंगी स्वतंत्र विचार करण्याची शक्ती निर्माण झाली पाहीजे. विद्यापीठ म्हणजे विद्यार्थ्यांच्या डोक्यात ज्ञान कोंबण्याची जागा नव्हे तर विद्यार्थ्यांनी या देशातील ज्ञान परंपरा समजावून घ्याव्यात, आपल्या विषयाच्या सांगोपांग अभ्यास करावा असे त्यांना वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''विद्यार्थ्याला ज्ञान आणि माहीती यातील अंतर समजले पाहीजे पण चिंतन मनन करून ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या पाहीजे''. मुंबई विधीमंडळावर सदस्य असताना विद्यापीठ कायदा दूरूस्त करून ज्ञानाच्या कक्षा सुधाराव्या व विद्यापीठ शिक्षणात उणिवा दूर करण्याच्या दृष्टीने प्रकाश टाकला होता. विद्यापीठ शिक्षणामध्ये बाबासाहेबांची भुमिका एकूणच महत्वाची राहीली होती.

शील संवर्धनाबाबत विचार :–



Scanned by CamScanner

शीलाशिवाय शिक्षणाची किंमत शुन्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''विद्येबरोबर आमच्यात शीलही असले पाहिजे. शीला शिवाय विद्या फुकाची आहे. विद्या एक शस्त्र आहे.'' एखादयाजवळ विद्येचे शस्त्र असेल व जो शिलवान असेल तर त्या योग्यतेने तो एकाचे स्वरक्षण करेल, तोच व्यक्ती जर शिलवान नसेल तर विद्येच्या शस्त्राने दुस–याचा घात करेल. विद्या ही तलवारीसारखी आहे परंतू तिचे महत्व तिला धारण करण्या–यावर अवलंबून राहील कारण अडाणी मनुष्य कोणास फसवू शकत नाही. फसवावे कसे हेच त्याला उमजत नाही. परंतू शिकल्या सवरलेल्या लोकांच्या ठिकाणी कोणास कसे फसवावे, त्या फसविण्यासाठी लागणारा युक्तीवाद असल्याने ख–याचे खोटे व खोटयाचे खरे ते भासवू शकतो. लबाडी करण्यास चातुर्य व बुद्धी लागते परंतू बुद्धी आणि चातूर्य हयाला सदाचाराची अर्थात शिलाची जोड मिळाली तर तो लबाडी वगैरे फसवाफसवी लोकात शिलाची अत्यंत जरूरी आहे. शीलशिंवाय जर शिकले सवरलेले लोक निपजू लागले तर त्याचे शिक्षणातच समाजाचा व राष्ट्रचा नाश आहे. तेव्हा शिलाची शिक्षणापेक्षा अधिक किंमत आहे.

शिक्षणाचे क्षेत्रः–

'विद्या हे समाजसुधारणेचे मुळ आहे'. असे सर्वच समाजसुधारकांनी मानले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर विद्येला दैवतच मानले आहे. संघटीत होऊन संघटन शक्ती मजबुत करून संघर्षाकडे जाण्यापूर्वी आपल्या अनुयायांना त्यांनी सर्वप्रथम शिका असा मोलाचा संदेश दिला आहे. शिक्षणाशिवाय आपली शक्ती जागृत होणार नाही. आपले सतव दृष्टीपथास येणार नाही, आत्मशक्ती, आत्मसन्मान व आत्मवृद्धी शिक्षणाशिवाय निर्माण होणार नाही. असा त्याचा ध्यास होता. आपण स्वतःमधील सत्व ओळखले पाहिजे. आपण कोणत्या पातळीवर आहोत याची आपणास जाणिव असली पाहीजे, त्याशिवाय आपल्यातील माणुस जागा होणार नाही हया सर्व बाबी करिता एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे 'शिक्षण'.

मागासलेल्या समाजातील प्रत्येक माणसाचा आत्मभान व आत्मशक्तीचा विकास शिक्षणाशिवया होणार नाही त्याशिवाय त्यांच्या जीवनात मुलभूत बदल होणार नाही. हे डॉ. बाबासाहेबांनी ओळखले. उच्च शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे महत्वाचे साधन असल्यामुळे दलितांना शिक्षण विषयक जाणिव निर्माण केली. एवढेच नव्हे तर बाबासाहेबांनी संविधानात विविध घातल्याने शिक्षणाची दारे सर्वांकरीता खुली झाली.



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

Scanned by CamScanner

निष्कर्ष :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र गोरगरीबांसाठी खुले करण्याचे महत्वपूर्ण ऐतीहासिक कार्य केले. हजारो वर्षे खितपत पडलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्वाचे आहे हे ओळखून शिक्षण घेण्याचा मुलमंत्र बाबासाहेबांनी दिला. शिक्षणामुळे गुलामो, अज्ञान, अंधश्रद्धा, वाईट चालीरिती यावर मात करता येते असा ठाम विश्वास बाबासाहेबांचा होता म्हणून त्यांनी सर्व समस्येचे मुळ अज्ञान आहे. समाजाला बलवान बनवायचे असेल तर शिक्षणशिवाय मार्ग नाही. बाबासाहेबांच्या शिक्षणविषयक कार्यामुळे येथील मागास समाज मोठया प्रमाणात शिक्षणाकडे वळला. भारतातील सर्व घटकांचा विचार करून घटनेत शिक्षणविषयक कलमांचा समावेश केला. आज आपण जे बघतो ते बाबासाहेबामुळेच शक्य झाले. वंचित उपेक्षितांच्या शिक्षणाचा विचार झाल्याने मोठया प्रमाणात मागासलेल्या समाजात परिवर्तन झाला आहे. शिक्षण हे विद्यार्थीकेंद्रीत असावे. हे बाबासाहेबांनी सर्व प्रथम ओळखले. स्वातंत्र्य, समता, बंधूता शिक्षणामुळेच प्रस्थापित झाली. एकूणच विचार केला तर मागासलेल्या समाजात शिक्षणामुळे क्रांतीकारी बदल घडून आला. भारताच्या शासनप्रणालीत मागासवर्गातील उच्चशिक्षितांचा सहभाग ही बाबासाहेबांच्या शिक्षणविषयक विचारांची देणगी होय.

संदर्भग्रंथ सुची :–

1. पवार दया, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, 1999
2. मून वसंत, बहिष्कृत भारत, शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई, प्र.आ. 1990
3. मेणसे श्री कृष्णा, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी, लोक वाङ्मय गृहमुंबई,2013
4. किर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्यूलर प्रकाशन मुंबई, चौ.आ. 2006
5. इंगोले यु.पी. ,फुले शाहू आंबेडकर शैक्षणिक विचार प्रवाह, आशिष प्रकाशन यवतमाळ, प्र.आ. 2005
6. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे खंड 18 वा भाग 31946 ते 1956,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र – साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र मुंबई 2002
7. डाहाट धनराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार खंड दोन, संकेत प्र. नागपूर



Scanned by CamScanner